| 52. | Lok Satta, Pune | 27 October 2009 |
|---|---|---|





# ‘सीएमएस-वातावरण’ चित्रपट महोत्सव आजपासून दिल्लीत

**पुणे, २६ ऑक्टोबर / प्रतिनिधी**

पर्यावरण व वन्यजीव विषयांवरील ‘सीएमएस-वातावरण’ या चित्रपट महोत्सवाला येत्या मंगळवारपासून (२७ ऑक्टोबर) नवी दिल्ली येथे सुरुवात होत असून, त्यात १७ राज्यांमधील १०६ फिल्म्स प्रदर्शित केल्या जाणार आहेत. महाराष्ट्रातील १४ फिल्म्सही या महोत्सवात पाहायला मिळणार आहेत.

नवी दिल्ली येथील इंडिया हॅबिटॅट सेंटरमध्ये होत असलेल्या या फेस्टिव्हलचे उद्घाटन केंद्रीय नवीकरणीय ऊर्जामंत्री डॉ. फारूक अब्दुल्ला यांच्या हस्ते होणार आहे. ‘सीएमएस-वातावरण’तर्फे भरविण्यात येणारा हा पाचवा फिल्म फेस्टिव्हल आहे. या वेळचा विषय ‘हवामानबदल आणि शाश्वत विकास’ हा असून, त्यात विशेषतः नैसर्गिक वारशाचे संरक्षण या मुद्दयावर भर दिला जाणार आहे. उद्घाटन सोहळ्यात प्रसिद्ध फ्रेंच दिग्दर्शक यान आर्थस-बर्ट्रांड यांची ‘होम’ ही फिल्म प्रदर्शित करण्यात येणार आहे. अशा आंतरराष्ट्रीय तसेच भारतीय फिल्मबरोबरच पर्यावरणाच्या विविध घटकांवरील परिसंवाद, कार्यशाळा व प्रदर्शनांच्या माध्यमातून या विषयांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

नवी दिल्लीतून आलेल्या फिल्म्स खालोखाल जास्त फिल्म्स महाराष्ट्रातील आहेत. त्यात विविध विषयांचा समावेश आहे. झाडांचे संवर्धन, घरगुती पद्धतीने इंधन व पैशाची बचत, पाण्याची टंचाई, कचरा आणि त्याद्वारे ग्लोबल वॉर्मिंगमध्ये होणारी वाढ, वाहतुकीच्या शाश्वत उपायांसाठी सार्वजनिक वाहतूक, गोव्यात लोहखनिजांच्या उत्खननामुळे तेथील पठारांची बिकट अवस्था, ग्लोबल वॉर्मिंगमुळे नाजूक परिसंस्थांवर होणारा विपरीत परिणाम, चिमण्यांच्या माध्यमांतून पर्यावरण रक्षणाचा संदेश अशा विविध विषयांच्या माध्यमातून पर्यावरण व निसर्गाचे विविध पैलू या महोत्सवात पाहायला मिळणार आहेत.

‘पर्यावरणाच्या गंभीर प्रश्नांबरोबरच शाश्वत तंत्रज्ञानाद्वारे त्याच्या उपयांवरही भर देण्यात येणार आहे,’ असे या फेस्टिव्हलच्या संचालक अलका तोमर यांनी म्हटले आहे. या महोत्सवातील उत्कष्ट फिल्म्सची निवड करून त्यांना खास पारितोषिके जाहीर करण्यात येणार आहेत. ■

## महाराष्ट्रातील १४ फिल्म्सचा समावेश

vatavaran
CMS ENVIRONMENT FORUM